**||श्री||**

**आढावा - २००५**

नमस्कार मंडळी! अगदी ३-४ दिवसांपूर्वी आपल्याला २००५ ने बाय बाय केलं. २००५ कधी आलं आणि कधी गेलं हे तर आपल्याला समजल सुद्धा नाही असं प्रत्येकाला वाटत असेल कदाचित. अहो बरोबर आहे! अगदी साहजिक आहे!

पण माणसाला आठवर्णींमध्ये रमायला आवडतं. बरोबर की नाही? चला तर मग आमच्याबरोबर २००५ सालात जरा फेरफटका मारूया. तुमच्या विस्मृतीत गेलेलं २००५ स्मृतीत आणण्याची जबाबदारी आमची.

सर्वप्रथम राजकारणाचा आढावा. .....

यंदा भारताच्या राजकारणात बरीच उलथापालथ झाली. युपीए सरकारला तर चांगलेच तडाखे बसले. मग तो श्री. नटवरसिंगांचा राजीनामा असो किंवा सुप्रीम कोर्टाने बिहारची विधानसभा भंग करण्याच्या युपीएच्या प्रस्तावावर मारलेली चपराक असो. गेली पंधरा वर्षे कसलीही नीतिमत्ता न बाळगणाऱ्या आरजेडीच्या सरकारला बिहारी जनतेने चांगलाच धडा शिकवला. बीमार बिहार आता श्री. नितीशकुमार परत सुजलाम् सुफलाम् नक्कीच बनवतील अशी आशा करायला काहीच हरकत नाही. बिहारात आरजेडी/युपीए हरण्याच कारण लालूप्रसाद जेवढे आहेत तेवढच त्याचं श्रेय एनडीएच्या निवडणूक रणनीतीलासुद्धा दिलं पाहिजे. बिहारमधली निवडणूक शांतपणे पार पडण्यासाठी झटणाऱ्या निवडणूक आयोगाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना मनोमन सलाम करावा अशी त्यांची कामगिरी होती. एनडीए बिहारमध्ये जिंकले परंतु हरियाणात सपशेल हरले. तिथे युपीएने चौटालांच्या सरकारला चांगलीच चपराक दिली. गोव्यात भाजपाचे सरकार कॉंग्रेसने पुन्हा एकदा खाली खेचले आणि श्री. प्रतापसिंह राणे पाचव्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. **"ऑपरेशन दुर्योधन"** तसेच **"ऑपरेशन चक्रव्यूह"** यामध्ये संसदेच्या अनेक खासदारांचे कारनामे दाखवून विविध चॅनेल्सनी सर्वच पक्षांना मान खाली घालण्यास भाग पाडलं. आता थोडी नजर टाकू आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणाकडे.

यंदाच वर्ष कोणाच बरं हे तुमच्यासारख्या चाणाक्ष मराठी लोकांना सांगायलाच नको. यंदाच वर्ष राज, राणे आणि आबांच. संपूर्ण वर्षभर राजकारणामध्ये आबांची तसेच राण्यांची धडाडी आणि राज ठाकरेंचा बाणेदारपणा यांचीच चर्चा होती. बऱ्याच वर्षांनंतर महाराष्ट्राच्या राजकारणामधला श्री. ठाकरे व श्री. पवार यांच्यावर असलेला प्रकाशझोत या तिघांवर या वर्षी नक्कीच स्थिरावला. शिवसेना या पक्षाला त्यांच्यातील अंतर्गत वादाचा चांगलाच फटका बसला. महाराष्ट्रात सध्या सत्ताधारी असलेल्या दोन पक्षांमध्येही सतत धुसफुस चालू होती. आता महाराष्ट्रातील या संपूर्ण राजकीय उलथापालथीत मराठी माणसाचं काय होणार? हा अगदी सहजगत्या उपस्थित होणारा प्रश्न आहे. आहे तुमच्याजवळ उत्तर? बघा, विचार करा. असो.

आता थोडसं आंतरराष्ट्रीय राजकारणाबद्दल. आपली सुरुवात तर नेहमीप्रमाणे ए म्हणजे अमेरिकेपासूनच. (नशीब अजूनही आपल्याकडची लहान मुलं ए फॉर ॲपलच म्हणतात) श्री. बुश यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली खरी पण इराक प्रश्नावर त्यांना सदैव अडचणीत यावं लागलं व त्यांची लोकप्रियता कमी झाली. त्यांच्या दोस्त राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांचीदेखील तीच गत झाली. इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यासाठीदेखील हे वर्ष प्रचंड उलथापालथीचं ठरलं. इस्त्रायलने गाझापट्टीतून

माघार घेतली. जर्मनीत प्रथमच एका महिलेला (अँजेला मर्केल) चॅन्सलर होण्याचा मान मिळाला. श्रीलंकेत मात्र चंद्रिका कुमारतुंगे यांच्याकडून सत्ता महिंद्रा राजपक्षे यांच्याकडे आली. परंतु तामिळी वाघांचा प्रश्न अजूनही तसाच अनुत्तरित. यावर्षी आंतरराष्ट्रीय राजकारणावरती अमेरिकेच्या एका व्यक्तीची छाया होती. ती व्यक्ती म्हणजे अमेरिकेची परराष्ट्रमंत्री कॉन्डोलिसा राईस. बाकी आंतरराष्ट्रीय राजकारण ढवळून निघायला विशेष असं कारण काही नाही.

आता थोडं भारताच्या अर्थकारणाबद्दल. यावर्षी भारतीय अर्थव्यवस्था एकामागून एक येणाऱ्या भयंकर संकटांचा सामना करीत होती. परंतु वर्षअखेरीस असं दृश्य दिसलं की भारतीय अर्थव्यवस्था यातून अतिशय खंबीरपणे उभी राहिली. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे देता येईल.

- ❖ भारतातील औद्योगिक क्षेत्रातील विकास दर १०.२ टक्के
- ❖ सेवाक्षेत्राचा विकास दर १० टक्के
- ❖ राज्यांची महसुली तूट १४ टक्क्यांपर्यंत कमी
- ❖ राजकोषीय तूट ४.४ टक्क्यांवरून ३.८ टक्क्यांवर
- ❖ प्राप्तीकरात २१ टक्के वाढ तर करमहसुलात अंदाजे २२ टक्के वाढ
- ❖ भाववाढ निर्देशांक ४.२ ते ४.३५ च्या मध्ये स्थिरावला.

कृषिक्षेत्राचा तितकासा विकास होऊ शकला नाही. पण नाबार्डने शेतकऱ्यांसाठी आकर्षक कज योजना प्रस्तावित केल्या. वस्त्रोद्योग तसच स्टील उद्योग यांनी यावर्षी अतिशय भरीव अशी कामगिरी केली. यावर्षीचा आपल्या अर्थकारणाचा सुपरस्टार म्हणजे व्हॅट. देशभरातील जवळजवळ २१ राज्यांना व्हॅटने भरपूर महसूल मिळवून दिला. जागतिक बॅन्केने या सर्वाची दखल घेऊन भारताची अर्थव्यवस्था २००५-२००६ या वर्षात ८ टक्के विकासदर गाठू शकेल अस भाकीत केलं. एकंदरीतच २००५ जे वर्ष आर्थिक स्थैर्याचे व आर्थिक विकासाचे असं म्हणायला काहीच हरकत नाही.

आता थोडा क्रीडा क्षेत्रात विहार करूया. यंदाच वर्ष कोणाच? अहो सोप आहे, सानिया, सचिन आणि महेंद्रसिंग धोणीचं. गेल्यावर्षी सानिया जागतिक क्रमवारीत २०० च्या आत होती. यावर्षी तिच जागतिक मानांकन आहे ३५. धोणीबद्दल काय बोलणार? फक्त एकच, धो डाला! आता हा धोणी म्हणे भरपूर दूध पितो. चला, म्हणजे इंडियन मिल्क प्रोड्यूसर्स असोसिएशनला एक मॉडेल नक्की मिळाला. जो दूध.... वंडरफुल दूध अस अगदी मनापासून म्हणेल. सचिनचं विक्रमी ३५ व शतक आपण याच वर्षात सर्वांनी अनुभवलं. हॅटस् ऑफ टू सचिन. मधे ह्या सर्वाचा विचार करून एका नवकवीने एक चारोळी केली होती.

**सचिन, धोणी, सानिया**

**तुम्हाला त्रिवार सलाम**

**बाकी खेळात खेळखंडोबाच**

**कशातच नाही राम, कशातच नाही राम.**

अहो नवकवी, आधी पुढचं वाचा आणि विचार करा.

यंदा भारताच्या धनुर्धारी संघाने (आर्चरी टीमने) जागतिक स्पर्धेत चांदीच पदक मिळवलं.

नारायण कार्तिकेयनने तमाम भारतीयांना त्याची झेप पाहून आश्चर्याने तोंडात बोटं घालायला लावली. एफ-१ (फॉर्म्युला - १) शर्यतीत भाग घेण सोप आहे का राव? अर्जुन अटवाल, अरेच्या! नाव नाही ऐकलं तुम्ही? अहो यानं तर यूएसपीजीए टूर खेळणारा पहिला भारतीय म्हणून मान मिळवला आणि भारताच नाव गोल्फसारख्या खेळातही अग्रस्थानी ठेवायचा प्रयत्न केला. बुद्धिबळ खेळातही पी. हरिकृष्णने सर्व जगाला आपली दखल घ्यायला लावली. विश्वनाथन् आनंद आणि कुंबळे यांच्या या वर्षीच्या कामगिरीला विसरून कसं चालेल? अंजू जॉर्ज आणि महेश भूपती यांनीही यावर्षी भारतीय क्रीडा क्षेत्रात दिलेल्या योगदानाकडे कानाडोळा करता येणार नाही. तेव्हा नवकवी,

**कशातच नाही राम**
**हे तुमच म्हणण**
**वाचून वरची माहिती पटलं की नाही**
**चुकीच हो तुमचं सांगणं, चुकीच हो तुमचं सांगणं**

या वर्षअखेरीस भारतीय क्रिकेट संघाने श्रीलंकेवर विजय प्राप्त करून आयसीसीच्या क्रिकेट मानांकनात तिसरा क्रमांक पटकावला. श्री. शरद पवार ह्यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची निवडणूक जिंकून मराठी माणूस तहातच नाही तर युद्धातसुद्धा जिंकतो हे सगळ्यांना दाखवून दिले. परंतु चॅपेल आणि गांगुली यांच्यामधील वादामुळे आपल्या क्रिकेटमधील वातावरण गढूळ आहे एवढं मात्र नक्की. हॉकीबद्दल काय डोंबल बोलणार? श्री. गेराल्ड राश (काही दिवसांपूर्वीच हे भारतीय हॉकी संघाचे प्रशिक्षक होते.) यांनी भारतीय हॉकी संघाची **"मॅड हाऊस"** म्हणून संभावना केली. पण कुणाला ना याचा खेद, ना खंत.

आता सगळ्यांच्या आवडत्या करमणूक क्षेत्राकडे जाऊ. सर्वात आधी मराठी चित्रपट, नाटक आणि मालिका.

श्वासपासून प्रेरणा घेऊन वेगवेगळ्या विषयांवरचे अनेक मराठी चित्रपट यावर्षी निर्माण झाले. केदार शिंदेने जत्रेतून मस्त प्रवास घडवला. महेश कोठारेंनी खबरदारमधून बहारदार मनोरंजन दिलं. निशिकांत कामतांचा डोंबिवली फास्ट वेगळीच वाट चोखाळणारा होता. संदीप कुळकर्णी, शिल्पा तुळसकर यांचा अभिनय तर लाजवाब. वर्षअखेरीस तर साने गुरुजी हा चित्रपटसुद्धा लोकांसमोर येऊन गर्दी खेचतोय अस समजतय.

मराठी टीव्हीवरील मालिकेत मात्र तोचतोचपणा जाणवतोय. अपवाद एखाददोन कार्यक्रमांचा. मानाचा मुजरासारख्या मालिकेने प्रेक्षकांच भरपूर मनोरंजन केलं. गौतमीच्या सहजसुंदर निवेदनाने कार्यक्रम खरोखरीच नीटनेटका वाटला. वस्त्रहरण कार्यक्रमात मच्छिंद्र कांबळी ह्यांनी अक्षरशः विनोद कांबळी एकेकाळी करायचा तशी तुफान फटकेबाजी केली.

मराठी नाट्यसृष्टी म्हणाल तर बेतास बात. नवीन नाटकं आली, पण प्रेक्षकांचा म्हणावा तसा प्रतिसाद मात्र मिळाला नाही. जादू तेरी नजर, अप्पा आणि बाप्पा या नाटकातील कलाकारांच्या अभिनयाला मात्र प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. अशोक हांड्यांचा **"मराठी बाणा"** हा कार्यक्रम बऱ्याच लोकांची वाहवा मिळवून गेला.

हिंदी चित्रपटांनाही २००५ चांगलच गेलं. ब्लॅक, सरकार, पेज थ्री, परिणिता हे या वर्षातील काही उत्तम चित्रपट म्हणता येतील. ब्लॅक आणि सरकारमधला अमिताभचा अभिनय पाहणे म्हणजे ट्रीट. पेज थ्री ने त्या कल्चरचे वास्तववादी दर्शन प्रेक्षकांना घडवले आणि राष्ट्रीय सन्मान मिळवला. यांच्याच बरोबर मैने

गांधी को नही मारा, इक्बाल, हजारों ख्वाईशें ऐसी या चित्रपटांनीसुद्धा प्रेक्षकांची वाहवा मिळवली. नो एन्ट्री, बंटी और बबली, क्या कूल हैं हम, दस, गरम मसाला या चित्रपटांनासुद्धा प्रेक्षकांनी उचलून धरलं. वर्षाच्या शेवटी आलेला अपहरणसुद्धा बरा चित्रपट होता. यावर्षी वरील चित्रपटातल्या मोजक्याच गाण्यांनी धुमाकूळ घातला.

**दस बहाने दिलने किये**
**गाना गाने कजरा रे**
**जस्ट चिल चिल जस्ट चिल आऊट यार**
**पिऊ बोले पिया बोले**

या वर्षी अभिषेक बच्चन चांगलाच फॉर्मात दिसला. अक्षयकुमारनेसुद्धा या वर्षात चार यशस्वी चित्रपट दिलेत. मंगल पांडे पडूनही अमीरची मार्केट व्हॅल्यू अजिबात कमी झाली नाही. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी **"पहेली"** गेला याच कोडं बऱ्याच चित्रपट जाणकारांना अजूनपर्यंत उलगडलेलं नाही.

आता थोडी चॅनेल मिडियाची दखल घेऊ. यावर्षी रिॲलिटी शो करण्याकडे चॅनल मिडियावाल्यांचा कल होता. ब्रेकिंग न्यूज या गोंडस नावाखाली या लोकांनी दर्शकांना काय काय बघायला लावला याची आठवण न केलेली बरी. सोनी टी. व्ही. वरील इंडियन आयडॉल यावर्षी चांगलच गाजलं. अभिजित सावंत, राहुल वैद्य या मराठी लोकांनी आयडॉलमधून मराठी बाणा सतत चमकवत ठेवला. तीच गोष्ट फेम गुरुकुलची. या कार्यक्रमाने श्रीनगरचा काझी व कोलकात्याची रूपरेखा यांना रातोरात प्रसिद्धी मिळवून दिली. परंतु सर्व चॅनेल्सच्या युद्धात बाजी मारली ती स्टार वनने. याला कारण त्यांनी सादर केलेले दोन कार्यक्रम - **"लाफ्टर चॅलेंज"** आणि **"नच बलिये."** सुनील पाल, अहसान कुरेशी, नवीन प्रभाकर तसेच नव्या पिढीच्या अनेक विनोदवीरांनी आपल्याला भरपूर हसवलं. **"पैचान कोन"** या शब्दाने **"लगे रहो"** या शब्दापेक्षाही जास्त लोकप्रियता मिळवली. नच बलिये विजेती ठरली ती पुन्हा एकदा मराठी जोडी. **सचिन-सुप्रिया.**

या वर्षी काही प्रसिद्ध व्यक्तींनी उच्चारलेल्या खालील वाक्यांना मिडियाने भरपूर प्रसिद्धी दिली.

**श्री. लालकृष्ण अडवाणी -** जेव्हा मुस्लिम मुस्लिमांच्या हितात तर ख्रिश्चन ख्रिश्चनांच्या हितात बोलतात तेव्हा कुणी त्यांच्यावर आक्षेप घेत नाही. परंतु हिंदू हिंदूंच्या हितात बोलायला लागला तर त्याला लगेच जातीयवादी ठरवले जाते.

**श्री. नारायण मूर्ती -** मला शेअर मार्केट समजत नाही आणि त्यामध्ये मी गुंतवणूक करत नाही.

**श्री. अजित सिंग -** जर दिल्लीला पाण्याची कमतरता असेल तर दिल्लीकर बाटलीबंद पाणी पिऊ शकतात.

**श्री. अझीम प्रेमजी -** एथिक्स आर असेटस्, दे आर नॉट लायबिलिटीज.

**श्री. शाहरूख खान -** मी लोकांना चांगल आयुष्य देऊ शकत नाही परंतु किमान त्यांची करमणूक तरी करू शकतो.

**श्री. मुलायमसिंग यादव -** क्रिकेट हा आपला खेळ नाही. कुस्ती हा आपला खेळ आहे. क्रिकेट अजिबात खेळलं जाऊ नये.

**<u>श्री. सीताराम येचुरी –</u>** द लेफ्ट इज नॉट पेट डॉग ऑर लॅप डॉग ऑफ एनिबडी बट वॉच डॉग. व्हेन इट बार्कस्, द गव्हर्मेंट विल हॅव टू लिसन, इफ इट डझ नॉट, धिस डॉग विल हॅव टु बाइट व्हेरी हार्ड.

२००५ सालात बऱ्याच प्रसिद्ध व्यक्तींना देवाज्ञा झाली. भारताचे पहिले दलित राष्ट्रपती श्री. नारायणन्. भारताचे पूर्वपंतप्रधान श्री. नरसिंह राव. सर्वश्री एच. के. एल. भगत, सुंदरसिंग भंडारी, सुनील दत्त हे राजकारणी हरपले. अमृता प्रीतम (लेखिका), रफिक झकेरिया, इस्माईल मर्चंट ह्यांनाही देवाज्ञा झाली. श्री. अमरीश पुरी, परवीन बाबी, जैमिनी गणेशन् या चित्रपट अभिनेत्यांनाही देवाज्ञा झाली. क्रिकेटपटू मुश्ताक अली, एकनाथ सोलकर, फाजल महमद हे ही या वर्षी हरपले. उद्योगपती ओ. पी. जिंदाल, तबला पंडित शफाअत अहमद खान हे ही निवर्तले. पोप जॉन पॉल (दुसरे) आणि व्यवस्थापन गुरू पीटर ड्रकर यांनाही या वर्षी देवाज्ञा झाली.

तर अस हे २००५ साल. आंतरराष्ट्रीय तसेच भारताच्या बाजारपेठेत खनिज तेलांच्या किंमती वाढवणारं, सेन्सेक्सला नवीन उच्चांक गाठून देणारं, दोन भावांमधला वाद आईला सोडवायला लावणारं, श्री. लक्ष्मी मित्तल यांना जगातील सर्वात श्रीमंत लोकांच्या यादीत बसवणारं, रोल्स रॉईस ही कार भारतात आणणारं, हिंदी चित्रपटातील बऱ्याच कलाकारांना ऑन स्क्रीन कपडे घालण्यापासून विसरायला लावणारं, क्रिकेटला टेनिस एलबो आणि मधल बोट यांच्यावर चर्चा करायला लावणारं, आशा भोसले यांना ग्रॅमी नॉमिनेशन देणारं, मृणाल सेन यांना दादासाहेब फाळके पारितोषिक मिळवून देणारं, ऐन दिवाळीत दिल्लीत अतिरेक्यांचा हल्ला बघायला लावणारं, त्सुनामीच्या प्रभावातून बाहेर पडत असलेला अंदमान दाखवणारं, नंदिता दास या भारतीय अभिनेत्रीला कान्स चित्रपट महोत्सवात ज्युरीचा सन्मान मिळवून देणारं, मल्लिका शेरावतला जॅकी चॅन या आंतरराष्ट्रीय सुपरस्टार बरोबर चमकायला लावणारं, लक्सचा पहिला पुरुष म्हणून शाहरूखला मान मिळवून देणारं, विजय मल्यांना किंगफिशर एअरलाईन काढायला लावणारं, निर्मिती सावंत यांचा मराठी कॉमेडी क्वीन हा किताब कायम राखणारं, विजयपत सिंघनियांना बलूनमधून सर्वोच्च उंची गाठून देणारं,कार्डिनल रेट झिंगर यांना पोपची पदवी देणारं, विश्वनाथन् आनंदला चौथ्यांदा बुद्धिबळातलं ऑस्कर मिळवून देणारं, डाव्या पक्षांना माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगात युनियन काढायला हवी अस वाटवणारं, मनमोहन सिंग आणि मुशर्रफ यांना दिल्लीच्या स्टेडियममध्ये भारत - पाक वन डे चा सामना शेजारी बसून पहायला लावणारं, टाटा समूहाला शंभर वर्षे पुरं करून देणारं.

तर असं हे २००५. आता २००६ तर सुरू झालय. तुम्ही सर्व नवीन वर्षाच्या हॅंग-ओव्हरमधून बाहेर पडून कामाला लागला असालच. या वर्षासाठी तुमच्याही काही आशा-आकांक्षा असतील. त्याची आपण नोंद जरूर ठेवावी. गेल्यावर्षीच्या कुठल्याही अपयशाकडे कानाडोळा करता कामा नये. परंतु भूतकाळामध्ये अडकून आज आणि उद्याची मजा घालवू नये. कालच्या विश्वातून स्वतःला सोडवून घ्यायचं आणि प्रगतीच्या नवीन वाटा शोधायच्या. शिस्त, नीटनेटकेपणा या दोन परवलीच्या गोष्टी. सुनिश्चित ध्येयापासून स्वतःच चित्त कधीच ढळू द्यायचं नाही. लक्षात ठेवायचं, आपणच आपलं सगळ्यात मोठं असेट आहोत. चला तर मग ....

**– मंदार माईणकर**